जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -२७०          दिनांक - ०९/०४/२०२३**

## हडपसर पोलीस ठाणे पुणे शहर

## अवैधरित्या पेट्रोल / डिझेल चोरी करणा-या टोळीचा पर्दाफाश करुन, त्यांचेकडुन २ कोटी २८ लाख रु किंचा मुद्देमाल केला जप्त

हडपसर पोलीस ठाणे हद्दीतील अवैध पेट्रोल / डिझेल चोरीचे अनुषंगाने वरीष्ठ पोलीस निरीक्षक, अरविंद गोकुळे हडपसर पोलीस ठाणे यांचे सुचनेनुसार तपास पथकाचे अधिकारी सपोनि.विजयकुमार शिंदे, पोउपनिरी.अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार,अनिरूध्द सोनवणे,भगवान हंबर्डे,मनोज सुरवसे,अमोल दणके, रशिद शेख असे दि.०८/०४/२०२३ रोजी पहाटे हडपसर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक अनुषंगाने पेट्रोलींग करीत असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार,मनोज सुरवसे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,काही इसम लक्ष्मी कॉलनी,गजानन मित्र मंडळा जवळ,१५ नंबर चौक,हडपसर पुणे येथे वाशी,नवी मुंबई येथुन एटीफ पेट्रोल (विमना करीता वापरण्यात येणारे पेट्रोल) डिझेल भरुन टॅंकर शिर्डी एअरपोर्टकडे जाणार आहेत.

सदरचे टॅंकर हे कंपनीकडुन प्रवासाचा मार्ग व वेळ नियोजीत केलेली असताना,तसेच टॅंकर मधील इंधन बाहेर काढता येवु नये याकरीता कंपनीने ॲटो लॉक व सील केलेले असतानादेखील काही इसम हिंदुस्थान पेट्रोलियम,इंडियन ऑईल,रिलायन्सच्या गाडी मधुन प्लॅस्टीक कॅन्ड मध्ये अवैधरित्या पेट्रोल व डिझेल या ज्वलनशील इंधनाची चोरी करीत आहेत वगैरे बातमी मिळाल्याने,सदरची माहीती वरीष्ठ पोलीस निरीक्षक,अरविंद गोकुळे हडपसर पोलीस ठाणे यांना कळवुन,त्यांचे आदेशान्वये सदर घटना ठिकाणी छापा टाकला असता,त्याठिकाणी दोन एचपीसीएल कंपनीचे टॅंकर मधील वॉल बॉक्स मधुन इंधन काढताना व सदर ठिकाणी इंधनाने भरलेले १४ प्लॅस्टीकचे कॅन मिळुन आले.

सदरबाबत पुढील कायदेशीर कारवाई करणेकामी सबंधित एचपीसीएल कंपनीचे अधिकारी व परीमंडळचे विभागाचे अधिकारी यांना पत्रव्यवहार करुन समक्ष बोलावून घेतले.

सदर ठिकाणी सहायक पोलीस आयुक्त,श्री.बजरंग देसाई, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,अरविंद गोकुळे, पोलीस निरीक्षक,गुन्हे,विश्वास डगळे यांनी तात्काळ भेट देवुन,सदर घटनेबाबत **हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर गुन्हा रजि.नं.५५४/२०२३,भा.द.वि.कलम ३७९,२८५,३४ सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३,७** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन,सदरील अवैद्यरित्या पेट्रोलची चोरी करणारे १) **सुनिलकुमार प्राननाथ यादव,वय २४ वर्षे,धंदा-ड्रायव्हर,रा.लक्ष्मी कॉलनी,हडपसर,पुणे, मुळगांव-लालगंज, उत्तर प्रदेश २)दाजीराम लक्ष्मण काळेल,वय ३७ वर्षे,धंदा- ड्रायव्हर,रा.विठ्ठलनगर,दुर्वांकुर पार्क, हडपसर,पुणे मुळगांव-वळई,ता.माण,जि.सातारा ३)सचिन रामदास तांबे,वय ४० वर्षे,धंदा-ट्रान्सपोर्ट व्यवसाय,रा.१५ नंबर विठ्ठलनगर,दुर्वांकूर पार्क,हडपसर पुणे ४)शास्त्री कवलु सरोज,वय ४८ वर्षे,धंदा-मजुरी,रा.सदर असे आ.क्र.१ ते ४ यांना अटक करण्यात आली असुन,(पाहिजे आरोपी) सुनिल रामदास तांबे,वय अंदाजे ३८ वर्षे,धंदा-ट्रान्सपोर्ट व्यवसाय,रा.सदर** यांचे सांगणेवरुन टॅंकर मधून पेट्रोल चोरी करीत असल्याचे आ.क्र.१ ते ४ यांनी सांगितले आहे.

हडपसर पोलीसांनी सदर ठिकाणाहून **पेट्रोल / डिझेल चोरी करण्याचे साहित्य ०८ पेट्रोलचे टँकर, १४ पेट्रोल कॅण्ड,इलेक्ट्रिक मोटारपंप वगैरे एकुण किंमत रुपये २,२८,०५,९९५/- रू किचा मुद्देमाल पंचनाम्याने जप्त** करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास वरीष्ठांचे आदेशान्वये सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-५,श्री.विक्रांत देशमुख यांचे मागदर्शनाखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे,श्री.बजरंग देसाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.अरविंद गोकुळे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.दिगंबर शिंदे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विश्वास डगळे यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक, विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक,अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार,सुशिल लोणकर, संदीप राठोड, सचिन जाधव, मनोज सुरवसे, अमोल दणके, भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे, रशिद शेख, शाहीद शेख, प्रशांत दुधाळ, प्रशांत टोणपे, अतुल पंधरकर, अजित मदने, चंद्रकांत रेजितवाड, कुंडलीक केसकर यांचे पथकाने करुन प्रशंसनीय कामगिरी केली आहे.




TATA
Hindustan Petroleum
GOODS CARRIER
GOODS CARRIER